बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २७६

नोटीस

दि. २५/०४/२०२५

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज दि. ३१/०५/२०२५ पूर्वी भरणेबाबत.**

महाविद्यालयातील खालील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शासनाच्या नियमानुसार राखीव (SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT) /खुल्या (Open-EBC/ EWS/ SEBC/ORPHAN) प्रवर्गातील ज्या ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधी इत्यादी शुल्क माफ करून प्रवेश देण्यात आलेला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधीची पूर्तती शासनाकडून होत असते त्यासाठी सवलतधारक विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक व बंधनकारक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजनेस पात्र असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही तांत्रिक कारणास्तव अथवा कागदपत्रांअभावी अथवा इतर कोणत्याही कारणाने महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरले नसतील अशा सर्व विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून विद्यार्थी लॉगीनव्दारे ऑनलाईन अर्ज भरावेत. अर्ज भरते वेळी विद्यार्थीनी सर्व (मूळ) ओरीजनल कागदपत्रे अपलोड करून ऑनलाईन अर्ज दि. ३१/०५/२०२५ या अंतिम तारखेपूर्वी भरून घ्यावा व महाविद्यालयाच्या विद्यार्थी विभागात अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी जमा करावेत.

वरील मुदतीत अर्ज भरणेकरिता विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारे दिरंगाई व टाळाटाळ करू नये. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधीची पूर्तता शासनाकडून न झाल्यास अशा प्रसंगी सदर शुल्काची वसूली विद्यार्थी व त्याचे पालकाकडून करण्यात येईल याची नोद संबंधित सवलतधारक विद्यार्थ्यांनी घ्यावी.

**-:महत्त्वाची सूचना:-**

१) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गासाठी शासनाने उत्पन्न मर्यादेची अट काढून टाकलेली असून त्याऐवजी विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे व इतर अटी शर्तीच्या आधारे शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरील योजनांव्दारे लाभ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त होते परंतू नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आहे तसेच शासनाच्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे (कॅप व्दारे) ज्या प्रवेश निश्चित झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरील मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

२) ज्या विदयार्थ्यांचे प्रवेश Against CAP स्तरावर झालेले आहेत व शासनाच्या नियमानुसार Post Matrics Scholarship (शिष्यवृत्ती) योजनेसाठी पात्र आहेत किंवा होत आहेत (ओपन व एसईबीसी विद्यार्थी वगळून) त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.

SC/ST साठी - Rs.2.5 Lakhs Below, (रूपये दोन लाख पन्नास हजार पर्यंत) वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट आहे. तर OBC/SBC/VJ/DT/NT साठी Rs.1.5 Lakhs Below रूपये एक लाख पन्नास हजार पर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट आहे

B.R.A.C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्युट पुणे-३७. Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.